


दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | शनिवार, 11 एप्रिल 2026 | अंक क्र. 322 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com



'महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंती निमित्त हार्दिक शुभेच्छा.

# ना. पंकजाताई मुंडेंचा पुण्यात झंझावाती दौरा ; नव्या पशुधन उद्योजकता योजनेची कार्यशाळा, पशुसंवर्धन विभागाच्या वाहनांचे लोकार्पण, इंद्रायणी, पवना नद्यांच्या प्रदुषणाची पाहणी

## पशुपालकांना आर्थिक सशक्त करण्यासाठी 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना प्रभावीपणे राबवा । अधिकाऱ्यांच्या बैठकीत केले आवाहन

■ पुणे : वृत्तसंस्था

'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने'च्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना रोजगारक्षम करुन त्यांना 'महाराष्ट्राचा आर्थिक कणा' करण्यावर भर आहे, ही योजना ग्रामीण पशुपालकांच्या आर्थिक व सामाजिक विकासाचे एक सशक्त माध्यम ठरणार आहे, असे प्रतिपादन राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी केले. पशुसंवर्धन आयुक्तालयातील कामधेनू सभागृहात 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' सादरीकरण व अमंलबजावणी कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुदंडा, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील, दुग्ध व्यवसाय विकास आयुक्त प्रशांत मोहोड, बुलढाणा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे, पशुसंवर्धन विभागाचे अतिरिक्त आयुक्त डॉ. शीतलकुमार मुकणे, विभागाचे सहसचिव निवृत्तीनाथ मऱ्हाळे, पशुसंवर्धन विभागातील प्रादेशिक पशुसंवर्धन उपायुक्त तसेच जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त उपस्थित होते.



### योजना प्रभावीपणे राबवा

■ मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेच्या माध्यमातून ग्रामीण युवकांना पशुपालनाकडे केवळ पारंपारिक व्यवसाय म्हणून न पाहता एक व्यावसायिक उद्योजकता म्हणून पाहण्यास प्रोत्साहन दिले जात आहे. दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन आणि शेळी-मेंढी पालनासाठी तांत्रिक व आर्थिक मदत देऊन ग्रामीण कुटुंबांचे उत्पन्न वाढवणे, हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. पशुपालनात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन पशुजन्य उत्पादनांची उत्पादकता वाढवणे व स्थानिक स्तरावरच स्वयंरोजगाराच्या माध्यमातून रोजगार विकासाच्या अधिकाधिक संधी निर्माण करण्यावर पशुसंवर्धन विभागाचा भर आहे. पशुसंवर्धन विभागाच्या या पुढाकारामुळे राज्याच्या ग्रामीण विकास प्रक्रियेला मोठी गती मिळणार आहे. त्यामुळे योजनेत पात्र लाभार्थ्यांची निवड करावी, योजनेत गैरप्रकार होणार नाही, याची दक्षता घ्यावी. ही योजना प्रभावीपणे राबवून यशस्वी करण्याकरिता सर्वांनी प्रयत्न करावेत. योजनेचे जिल्हा, तालुकानिहाय शिबारांचे आयोजन करावे तसेच योजनांची अधिकाधिक जनजागृती करावी. कामाचा महिनानिहाय आढावा घेण्यात येईल. येत्या काळात लाभ वाटपाबाबत भव्य राज्यस्तरीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल, असेही त्या म्हणाल्या.

### कोंबडीच्या अंडयाचा ब्रँड व्हावा

■ पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून शेळीपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन आदी व्यवसाय करुन शेतकऱ्यांमधून उद्योजक निर्माण होत आहेत. पशुसंवर्धनाला उद्योजकाचा दर्जा दिला पाहिजे. ग्रामीण युवकांना प्रोत्साहन दिले पाहिजे. येत्या काळात वराहपालन व्यवसायावर भर द्यावा, अंड्याचा ब्रँड निर्माण करण्याकरिता सामूहिक दृष्टीकोन ठेवून प्रयत्न करावे. पशुसंवर्धन क्षेत्रात एक जिल्हा एक उत्पादन या तत्वावर काम करावे असे सांगून, परळी वैजनाथ येथे येथील महापशुसंर्वधन एक्स्पोचे यशस्वीपणे आयोजन केल्याबद्दल श्रीमती मुंडे यांनी विभागाचे अभिनंदन केले.

### नव्या वाहनांचे लोकार्पण

■ याप्रसंगी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकरिता खरेदी करण्यात आलेल्या वाहनांचे श्रीमती मुंडे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. महा पशुधन वार्ता मासिकांचे प्रकाशन करण्यात आले तसेच 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' तयार करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी आणि परळी वैजनाथ येथे येथील महापशुसंर्वधन एक्स्पोचे यशस्वी आयोजन केलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले.

### नद्यांच्या प्रदूषणाची पाहणी

■ रावेत व तळवडे येथील 'रॉ वॉटर पंपिंग स्टेशन' ला भेट देऊन पंकजाताई मुंडे यांनी पवना व इंद्रायणी नदीच्या प्रदूषण सद्यस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली. नदीपात्रात वाढलेली जलपर्णी आणि सांडपाण्यामुळे होणारे प्रदूषण ही गंभीर बाब आहे. नागरिकांना शुद्ध पाणी मिळावे आणि नदीचे पर्यावरण टिकून राहावे, यासाठी तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना विभागाला दिल्या.याप्रसंगी आ.शंकर जगताप, महापौर रवी लांडगे, सदाशिव खाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# 10 वी, 12 वी नंतर पुढे काय?; परळीत रविवारी 'एसआयओ'तर्फे भव्य करिअर मार्गदर्शन शिबिर


■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी):

दहावी आणि बारावीच्या परीक्षांनंतर विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्वाचा टप्पा सुरू होतो. नेमकी कोणती दिशा निवडावी, या संभ्रमात असलेल्या विद्यार्थ्यांना योग्य दिशा दाखवण्यासाठी विद्यार्थी संघटना एसआयओ (SIO) च्या वतीने एका विशेष करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर रविवार, १२ एप्रिल रोजी सकाळी १०:०० वाजता डॉ. भालचंद्र वाचनालय हॉल येथे संपन्न होणार आहे.

विद्यार्थ्यांनी केवळ पारंपारिक शिक्षणाकडे न वळता आधुनिक काळातील नवनवीन संधी ओळखाव्या, या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. तज्ज्ञांचे मार्गदर्शन: क्षेत्रातील अनुभवी तज्ज्ञ १० वी आणि १२ वी नंतरच्या विविध अभ्यासक्रमांची विविध संधींची माहिती: व्यावसायिक कोर्सेस, तांत्रिक शिक्षण आणि स्पर्धा परीक्षांमधील करिअरच्या संधींवर प्रकाश टाकला जाईल. करिअरची निवड करताना कोणती खबरदारी घ्यावी आणि भविष्यातील आव्हाने कशी पेलावीत, याचे सखोल विश्लेषण केले जाणार आहे. "विद्यार्थ्यांनी योग्य वेळी योग्य करिअरची निवड केल्यास त्यांचे भविष्य उज्ज्वल होईल. याच सामाजिक भावनेतून एसआयओ दरवर्षी या शिबिराचे आयोजन करते," अशी माहिती एसआयओ शहर अध्यक्ष सय्यद उमेर जाफर यांनी दिली आहे. या मार्गदर्शन शिबिराचा लाभ परळी शहर व परिसरातील सर्व विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. **अधिक माहितीसाठी संपर्क:** ८३२९३९७९४९ / ८६२३८९२९०६





# नर्मदा तीरावरील महायोगी दादा गुरु महाराज यांची आ. सुरेश धस यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

■ आष्टी (प्रतिनिधी)

मध्यप्रदेशातील पवित्र नर्मदा नदी तीरावर दीर्घकाळ कठोर साधना करणारे संत समर्थ दादा गुरु महाराज यांनी शुक्रवारी आष्टी विधानसभेचे आ. सुरेश धस यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी आ.सुरेश धस पत्नी सौ. प्राजक्ताताई धस,युवा नेते सागर धस यांनी त्यांचे सस्नेह व आदरपूर्वक स्वागत केले.

दादा गुरु महाराज हे गेल्या पाच वर्षांहून अधिक काळ 'निराहार' राहून केवळ नर्मदा जल अथवा वायूवर साधना करत असल्याचे मानले जाते. ते नर्मदा नदी संवर्धन, पदयात्रा, वृक्षारोपण तसेच पर्यावरण जनजागृती यांसारख्या उपक्रमांमध्ये सक्रिय असून, त्यांनी आतापर्यंत चार लाख किलोमीटरहून अधिक पायी प्रवास केल्याची नोंद आहे.

भेटीदरम्यान दादा गुरु महाराजांनी आ. सुरेश धस, सौ. प्राजक्ताताई धस, सागर धस व इतर कुटुंबीयांना आशीर्वाद दिले. "ज्यांनी मच्छिंद्रनाथ बाबा यांच्या समाधीचे प्रवेशद्वार केले, त्यांच्या घरात मी प्रवेश केला म्हणजे माझ्याच घरात आलो," असे भावनिक उद्गार त्यांनी व्यक्त केले. तसेच भीमा नदी, अमरजा नदी आणि गोदावरी नदी या केवळ नद्या नसून शक्तिस्थान असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी प्रभू रामचंद्र यांच्या वास्तव्याशी निगडित नदीपात्र कोरडे झाल्याचा उल्लेख करत, भविष्यात भीमा नदीचे पाणी या भागात येऊन सुमारे ७५ ते ८० गावांमध्ये हरित क्रांती घडेल, असा विश्वास व्यक्त केला. त्यांच्या या अमोघ वाणीतून समाजहित, पर्यावरण संवर्धन आणि धार्मिक मूल्यांच्या जपणुकीचा संदेश देण्यात आला. या सदिच्छा भेटीमुळे परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले. यावेळी प्रमुख पदाधिकारी, व्यापारी,भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांमध्ये उत्सुकता आणि समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले.

# संपादकीय

## युद्ध विरामालाच विराम?

**शस्त्रबंदीमुळे तेल आयातीवर अवलंबून असणारी भारतासारखी अनेक राष्ट्रे सुखावली. श्रेय कोणीही घ्या, पण युद्ध एकदाचे थांबू द्या, असा सूर गेल्या काही दिवसांपासून तेल आयातीला अवलंबित्व असणाऱ्या राष्ट्रांकडून उघडपणे आळविला जात होता. या युद्धाची जितकी किंमत युद्धामध्ये सहभागी असणाऱ्या अमेरिका, इस्रायल, इराण या तीन राष्ट्रांना मोजावी लागली नसेल, त्याहून अधिक किंमत तेल आयातदार राष्ट्रांना मोजावी लागली.**

अमेरिका आणि इराण यांच्यात १४ दिवसांकरिता युद्धविराम जाहीर झाला असला, तरी हा विराम क्षणिक ठरण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. कारण त्याला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची सातत्याने बदलणारी भूमिका व युद्ध लढविण्याची इराणची खुमखुमी यामुळे युद्धविराम फार काळ टिकणार नसल्याचे संकेत होते. अमेरिका आणि इराण यांच्यात झालेल्या युद्धविरामाला अवघा एक दिवस लोटत नाही, तोच या युद्धविरामाचे भवितव्य संकटात सापडले. दोन्ही देशांमध्ये पाकिस्तानमधील इस्लामाबाद येथे नियोजित असलेल्या शांतता चर्चेबाबतही अनिश्चितता निर्माण झाली. इराणचे पाकिस्तानमधील राजदूत अमिरी मोगदम यांनी इराणचं शिष्टमंडळ शांतता प्रस्थापित करण्यासाठीच्या चर्चेसाठी पाकिस्तानमध्ये येणार असल्याची माहिती एक्सवरील पोस्टमधून दिली होती. मात्र काही वेळातच त्यांनी ही पोस्ट हटवली. त्यामुळे पुन्हा युद्ध भडकण्याचे संकेत निर्माण झालेत. अमेरिका आणि इराणमध्ये सध्या दोन आठवड्यांचा युद्धविराम सुरू असतानाच, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी पुन्हा एकदा इराणला निर्वाणीचा इशारा दिला. दोन्ही देशांमध्ये अंतिम आणि ठोस करार होत नाही, तोपर्यंत अमेरिकेचे लष्करी बळ इराणच्या सीमांनजीक तैनात राहील. तोपर्यंत आमचे सैन्य माघारी फिरणार नाही, असे ट्रम्प यांनी स्पष्ट केले आहे. हा करार यशस्वी झाला नाही, तर इराणवर आतापर्यंतचा सर्वात मोठा हल्ला केला जाईल, अशी धमकीही त्यांनी दिली. त्यामुळे युद्धबंदीची घोषणा पुन्हा एकदा नामधारी ठरण्याची शक्यता असून विनाशकारी युद्ध अंतिम क्षणापर्यंत लढले जाणार असल्याचे चित्र निर्माण झाले. अमेरिका-इस्रायल विरुद्ध इराण हा संघर्ष २८ फेब्रुवारीपासून सुरू आहे. बुधवारी १४ दिवसांकरता अमेरिका-इराण या दोन देशांमध्ये शस्त्रसंधी झाली. या शस्त्रसंधीला अमेरिकेचा युद्धातील मित्र इस्रायलने देखील संमती दिली. पाकिस्तानच्या मध्यस्थीने दोन आठवड्यांची शस्त्रसंधी झाल्याचे सांगण्यात आले. या शस्त्रबंदीमुळे तेल आयातीवर अवलंबून असणारी भारतासारखी अनेक राष्ट्रे सुखावली. श्रेय कोणीही घ्या, पण युद्ध एकदाचे थांबू द्या, असा सूर गेल्या काही दिवसांपासून तेल आयातीला अवलंबित्व असणाऱ्या राष्ट्रांकडून उघडपणे आळविला जात होता. या युद्धाची जितकी किंमत युद्धामध्ये सहभागी असणाऱ्या अमेरिका, इस्रायल, इराण या तीन राष्ट्रांना मोजावी लागली नसेल, त्याहून अधिक किंमत तेल आयातदार राष्ट्रांना मोजावी लागली आहे. या राष्ट्रांमध्ये भारताचा अपवाद वगळता अन्य राष्ट्रांमध्ये महागाईचा आगडोंब उसळला आहे. ही युद्धबंदी प्रत्यक्षात येणार की केवळ कागदोपत्रीच घोषणा राहणार, यावर प्रश्नचिन्ह कायम आहे. इराण आणि अमेरिका यांच्यात शस्त्रसंधी होताच स्वतःची पाठ थोपटून घेणारा पाकिस्तान आता तोंडावर पडला आहे. युद्धबंदीच्या घोषणेनंतर अवघ्या काही तासांमध्ये इस्रायलने लेबनॉनवर हल्ले केले. मग इराणने यूएई, कुवेतला लक्ष्य केले. शस्त्रसंधीची घोषणा झाल्यावर २४ तासांच्या आत पुन्हा युद्धविषयक घडामोडी सुरूच राहिल्या. हल्ले होतच राहिले. यामुळे पाकिस्तानने घडवून आणलेल्या व छातीचा ढोल करत जगभर दवंडी पिटवलेल्या शस्त्रसंधीचे नेमके काय झाले, असा प्रश्न विचारला जाऊ लागला. पण लेबनॉन या शस्त्रसंधीचा भाग होता की नाही, यावरून सगळा घोळ झाला. मध्यस्थीचा दावा पाकिस्तानने केल्याने आता त्यांची गोची झाली. इस्रायलने त्यांचा शेजारी देश असलेल्या लेबनॉनवरील हल्ले सुरूच ठेवले. त्यामुळे पाकिस्तान तोंडावर आपटला. शस्त्रसंधी सगळ्या ठिकाणी लागू आहे, त्यात लेबनॉनचाही समावेश असल्याचे पाकिस्तानचे पंतप्रधान शरीफ यांनी जाहीरपणे म्हटले होते. १० एप्रिलला इस्लामाबादमध्ये होत असलेल्या बैठकीत या सगळ्या मुद्द्यांवर शिक्कामोर्तब होईल, असा विश्वासही शरीफ यांनी व्यक्त केला. त्यांनी केलेला दावा आणि युद्धबंदीनंतरही सुरू असलेले हल्ले यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर संभ्रम निर्माण झाला. कारण शस्त्रसंधीसंदर्भात इस्रायल आणि अमेरिकेकडून करण्यात आलेली विधाने परस्परविरोधी आहेत. अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी वान्स यांनी शरीफ यांचा दावा स्पष्ट शब्दांत खोडून काढला. 'काहीतरी गैरसमजातून हा प्रकार घडला. लेबनॉनचा समावेश शस्त्रसंधीत असल्याचं इराणला वाटलं असेल. पण आम्ही कधीही तसे आश्वासन दिलेलं नाही. तसे संकेत देखील आम्ही कधी दिले नव्हते,' असे अमेरिकेने स्पष्ट केल्याने पाकिस्तानच्या मध्यस्थीवर प्रश्न उपस्थित झाले. अमेरिकेनं केलेला दावा खोटा असल्याचं पाकिस्तानचं म्हणणं आहे. इराणसोबत झालेल्या शस्त्रसंधीत लेबनॉनच्या मुद्द्याचा समावेश होता, असा दावा अमेरिकेतील पाकिस्तानचे राजदूत रिजवान सईद शेख यांनी केला. लेबनॉनचा विषय शस्त्रसंधीत नव्हताच, असा इस्रायलचाही दावा आहे. अमेरिका, इस्रायलनं घेतलेल्या भूमिकेमुळे मध्यस्थीसाठी स्वतःची पाठ थोपटून घेणाऱ्या पाकिस्तानची आंतरराष्ट्रीय पातळीवर फजिती झाली. युद्ध सुरू झाल्यावर भारतासारख्या अनेक देशांमध्ये इंधन टंचाईचे सावट निर्माण झाले. अनेक उद्योगांवर परिणाम झाला. महाराष्ट्रामध्ये रोजगार-व्यवसायासाठी आलेले परराज्यातील मजूर, कर्मचारी आपल्या राज्यात निघून गेल्याने छोट्या व्यवसायांवर परिणाम झाला. किरकोळ खाद्यपदार्थांच्या गाड्या रस्त्यावरून गायब झाल्या. अनेक हॉटेल्समधील गॅसच्या टाक्या अदृश्य झाल्या. कोळशावर शेगड्या पेटविण्यात आल्या. इंधनाचे दर वाढल्यावर महागाईला पोषक वातावरण निर्माण होते. इंधनाचे दर उतरले तरी महागाई कमी होत नसल्याचा आजवरचा अनुभव आहे. इस्रायल आणि हिजबुल्ला यांच्यातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर इराणने पुन्हा एकदा आक्रमक पवित्रा घेतला. जगातील अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या 'होर्मुझच्या सामुद्रधुनी'तून जाणाऱ्या प्रत्येक तेलवाहू जहाजाकडून आता इराण प्रति बॅरल १ डॉलर इतका 'टोल' वसूल करणार आहे. विशेष म्हणजे, हा कर क्रिप्टोकरन्सीच्या माध्यमातून भरावा लागणार. त्यामुळे भारताला महागड्या दराने तेल खरेदी करावं लागणार.

# श्री गोरक्षनाथ महाराज उत्सव सोहळ्याचे आयोजन

■ **पेण वृत्तसंस्था**

खारेपाट भागातील विठ्ठल नगर या गावात दरवर्षी प्रमाणे नाथसंप्रदायातील श्री.गोरक्षनाथ महाराजांचा जन्मोत्सव सोहळा सोमवार दि.१३ एप्रिल २०२६ रोजी चैत्र-वरूथिनी एकादशीच्या दिवशी मोठ्या भक्तिभावाने अन् उत्साहात साजरा होणार आहे.

यावेळी उत्सवात दोन दिवस चालणाऱ्या किर्तनकार हभप प्राची मंदार व्यास (डोंबिवली)यांच्या कीर्तनाला हार्मोनियम साथ किशोर अनंत म्हात्रे (दिव) तर तबलासाथ जितेंद्र अनंत म्हात्रे यांची लाभणार आहे. सोमवारी ठीक दुपारी १२ वाजून १५ मिनिटांनी श्रींवर फुले उधळली जातील व त्यानंतर दुपारी १:०० वा.महाप्रसादाची सुरुवात होईल.



यावर्षी उत्सवातील महाप्रसाद - कै काशिनाथ मऱ्या पाटील यांच्या स्मरणार्थ नातू मितेश सुर्याजी पाटील व साहिल सुर्याजी पाटील (घोडाबंदर) यांच्यामार्फत दिला जाणार आहे. दुपारी १:३० वा. श्री अजित दिनकर ठाकूर यांच्या सौजन्याने भजन जोस्तनाई म्युझिकल ग्रुप गणपतीवाडी, पेण, गायिका- सौ.सायली विकी मानकवळे, पखवाज वादक श्री.विकी मानकवळे व सहकारी यांचा कार्यक्रम होईल. तसेच - कै. विठोबा महादू म्हात्रे यांच्या स्मरणार्थ सून- जयप्रभा प्रफुल्ल म्हात्रे (मा सभापती कृषी उत्पन्न बाजार समीती पेण) विठ्ठलनगर यांच्या सौजन्याने सायं ०६:०० वा श्री सिध्दीविनायक प्रासादिक संगित भजन मंडळ, शिंगणवट, गुरूवर्य संगितरत्न केशवराव बुवा पाटील कळवेकर, गुरूवर्य भजन सम्राट दत्तात्रेय बुवा ओढांगीकर यांचे शिष्य रायगड भूषण पुरस्कार व कोकण संगितरत्न पुरस्कार सन्मानित, संगित विशारद बुवा कु. ओंकार नंदकुमार पाटील (बोरी पेण) यांच्या भजनाचा कार्यक्रम होणार आहे. रात्रौ १२:०० वा श्रींचा प्रदक्षिणा कार्यक्रम संपन्न होईल. या उत्सवाच्या कार्यक्रमासाठी श्री. गोरक्षनाथ महिला मंडळ तसेच श्री गोरक्षनाथ क्रीडा मंडळ विठ्ठलनगर यांच्याकडून दरवर्षी आर्थिक मदत व संपुर्ण सहकार्य केले जाते. तसेच उत्सवाचे व्यवस्थापन व नियोजन विठ्ठलनगर, घोडाबंदर, मळेघरवाडी, मंत्रीवाडी, जनवली, ठाकूरबेडी, पैराणकरवाडी, तामषीबंदर, बोरकरवाडी, बहिरामकोटक, लाखोले, म्हात्रे ठाकूरवाडी व सर्व बेडेकर मंडळी यांच्या सहकार्याने होते.

तरी या उत्सवाला भाविकांनी मोठया संख्येने उपस्थित राहून श्री. दर्शन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे श्री गोरक्षनाथ संस्था, मु. विठ्ठल नगर ता. पेण-रायगड यांनी कळविले आहे.

# दरमहा शिवजयंती उपक्रमात काव्यस्पर्धा

डॉ.पंजाबराव देशमुख अकादमी च्या मिशन आयएएस या उपक्रमांतर्गत दरमहा शिवजयंती साजरी करण्यात येते. 19 फेब्रुवारीला शिवजयंतीचा मुख्य कार्यक्रम झाल्यानंतर 19 मार्चला स्पर्धा परीक्षेची एबीसीडी हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले असून स्पर्धा परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना हे पुस्तक विनामूल्य वितरित करण्यात आले.येत्या 19 एप्रिलला दरमहा शिवजयंती समिती मार्फत छत्रपती श्री शिवाजी महाराज व राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जीवनावर एका काव्यस्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ज्या कवींना या उपक्रमात भाग घ्यावयाचा आहे त्यांनी आपल्या कविता दरमहा शिवजयंती या उपक्रमाचे सचिव प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे यांच्या



9890967003 या क्रमांकावर आपली कविता पाठवावी. या काव्य स्पर्धेमध्ये विजयी होणाऱ्या स्पर्धकांचा 19 मे 2026 रोजी अमरावती येथील सर्वात भव्य असलेल्या व आठ एकरात विस्तार असलेल्या सिकची रिसॉर्टमध्ये बक्षीस समारंभ संपन्न होणार आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना सन्मान म्हणून सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. ज्यांना पोस्टाने कविता पाठवायचे आहे त्यांनी आपल्या कविता प्रा. डॉ नरेशचंद्र काठोळे सचिव दरमहा शिवजयंती जिजाऊ नगर विद्यापीठ रोड महापौरांच्या बंगल्यासमोर अमरावती कॅम्प

444602 या पत्त्यावर पाठवाव्या असे आवाहन डॉक्टर पंजाबराव देशमुख अकादमीच्या प्रसिद्धी पत्रकातून करण्यात आले आहे.

■ **प्रा. डॉ.नरेशचंद्र काठोळे**
**संचालक मिशन आयएएस**
**अमरावती कॅम्प**
**9890967003**



## प्रवीण तोगडिया यांनी घेतले प्रभू वैद्यनाथांचे दर्शन

विश्व हिंदू परिषदेचे मा.अध्यक्ष प्रवीणजी तोगडिया यांनी परळी येथील भगवान वैद्यनाथ प्रभूंचे दर्शन घेत पूजा केली. यानंतर वैद्यनाथ मंदिर ट्रस्टच्या वतीने प्रा. बाबासाहेब देशमुख यांनी प्रवीणजी तोगडिया यांचा भगवान वैद्यनाथ प्रभूंची प्रतिमा देऊन सत्कार केला. यावेळी मंदिर ट्रस्टचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# लोकरंग

## साप्ताहिक संवाद यंदा होणार कमी वर्षाव

नेमेचि येतो मग पावसाळा ... अशी उक्ती प्रचलित आहे.अर्थातच ऋतुचक्राप्रमाणे दरवर्षी साधारणपणे जून महिन्यात आपल्याकडे पावसाळा सुरु होतो आणि ऑक्टोबर महिन्यात पावसाळा संपतो. मात्र अलीकडच्या काही दशकांमध्ये निसर्गाचे हे ऋतुचक्र विस्कटत चाललेले दिसतेय. ऐन नोव्हेंबर,डिसेंबर महिन्यात किंवा अगदी एप्रिल महिन्यात देखील अवकाळी पाऊस कोसळु लागलेला आहे. त्यामुळे अर्थातच प्रामुख्याने शेतकऱ्यांचं प्रचंड नुकसान होतेय. राज्याचा हवामान शाश्त्र विभाग दरवर्षी पावसाचा अंदाज वर्तवत असतो. मागील दोन वर्षात सरासरीच्या तुलनेत पावसाचे प्रमाण हे कितीतरी अधिक होते. मात्र यंदा एल निनो चा प्रभाव असल्यामुळे कमी वर्षाव होणार असल्याचे भाकीत स्कायमेट या खाजगी हवामान अंदाज शाश्त्रज्ञांनी वर्तवले आहे. याच अनुषंगाने स्कायमेटने व्यवस्थापकीय संचालक शाश्त्रज्ञ जतीन सिंग यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

## यंदाच्या मान्सूनचा पहिला अंदाज नेमका काय आहे?

■ **स्कायमेट या हवामान शाश्त्र विभागाच्या अंदाजानुसार यंदा एल निनो चा प्रभाव असल्यामुळे सरासरीपेक्षा यंदा पावसाचे प्रमाण हे कमी असणार आहे.जून ते सप्टेंबर या चार महिन्यात ८६८.६ मिलीमीटर या दीर्घकालीन सरासरीच्या ९४ टक्के अधिक किंवा उणे ५ टक्के पावसाची शक्यता आहे. जानेवारी २०२६ मध्ये सक्यमेटने जे मूल्यांकन केलेलं होते तोच अंदाज कायम आहे. दीड वर्षाच्या ला नीना स्थितीनंतर प्रशांत महासागर एन्सो स्थितीसाठी अनुकूल झालेला आहे**

## एल निनो म्हणजे नेमका काय प्रकार आहे?

■ एल निनो हि पॅसिफिक महासागरातील विषुववृत्तीय भागात निर्माण होणारी एक नैसर्गिक हवामान प्रक्रिया आहे. ज्यामध्ये समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान सामान्यांपेक्षा जास्त उष्ण होते. हि घटना दार २ ते ५ वर्षांनी घडते. आणि त्यामुळे जागतिक हवामानं,वाऱ्याचा प्रवाह आणि मान्सूनवर देखील त्याचा परिणाम होतो. या एल निनोमुले यंदा भारतात सरासरीच्या तुलनेत खूप कमी पाऊस पडणार आहे. एल निनो मुले मध्य आणि पूर्व पॅसिफिक महासागराच्या पाण्याचे तापमान असामान्य वाढून उष्णतेमुळे ढगांची निर्मिती आणि वाऱ्याची दिशा बदलते ज्याचा परिणाम मान्सूनवर होतो.

## एल निनोची हि नैसर्गिक स्थिती टाळता येणे शक्य नाही का?

■ **एन्सो घटकांव्यतिरिक्त इंडियन ओशन डायपोलचाही मान्सूनवर प्रभाव असतो. हंगामात एक मनबुत सकारात्मक आयपोडी तटस्थ किंवा सकारात्मक राहणायचा अंदाज आहे. यामुळे मान्सूनचं सुरवातीला चांगलं हातभार लागेल. मात्र हंगामाच्या दुसऱ्या टप्प्यात मान्सून कमकुवत होण्याची शक्यता आहे. स्कायमेटच्या अंदाजानुसार मध्य व पश्चिम भागातील मुख्य मान्सून पर्जन्य क्षेतारत अपुरा पाऊस पडण्याची शकयता आहे. .**

## अर्थभान

■ कॅप्री ग्लोबल कॅपिटलचा ₹६०० कोटींच्या रोख्यांच्या विक्रीचा 'पहिला टप्पा' घोषित

■ कॅप्री ग्लोबल कॅपिटल लिमिटेडने ("कंपनी") सुरक्षित, मानांकन प्राप्त, सूचीबद्ध आणि परतफेडयोग्य 'अपरिवर्तनीय रोखे नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर्स (एनसीडी)'च्या सार्वजनिक विक्रीचा 'पहिला टप्पा' गुरुवारी जाहीर केला. या रोखेविक्रीतून एकूण ₹६०० कोटी रुपयांपर्यंत निधी उभारला जाणार असून, यामध्ये ₹२,०० कोटींचा मूळ आकार (बेस इश्यू साइझ) निश्चित करण्यात आला असून, अधिक प्रतिसाद मिळाल्यास जास्तीचे ४०० कोटी रुपये स्वीकारण्याचा 'ग्रीन शू' पर्याय कंपनीने खुला ठेवला आहे." कॅप्री ग्लोबल कॅपिटल लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्री. राजेश शर्मा म्हणाले, "सुरक्षित, मानांकन प्राप्त, सूचीबद्ध आणि परतफेडयोग्य अपरिवर्तनीय रोख्यांच्या पहिल्या टप्प्यातील विक्रीचा शुभारंभ जाहीर करताना आम्हाला आनंद होत आहे. कॅप्री ग्लोबल कॅपिटलमध्ये, आम्ही आमच्या चार कर्ज विभागांद्वारे म्हणजेच एमएसएमई कर्जे, गृह कर्जे, सोने तारण कर्जे आणि बांधकाम वित्तपुरवठा विविध प्रकारची सुरक्षित आणि तारण-आधारित कर्जे उपलब्ध करून देतो." अपरिवर्तनीय रोख्यांच्या या सार्वजनिक विक्रीद्वारे गुंतवणूकदारांना २४ महिने, ३६ महिने, ६० महिने आणि १२० महिने असे गुंतवणुकीचे विविध कालावधीचे पर्याय उपलब्ध आहेत. तसेच, गुंतवणूकदार मासिक किंवा वार्षिक स्वरूपात व्याजाची रक्कम स्वीकारण्याचा पर्याय निवडू शकतात आणि त्यांना वार्षिक ९.५० टक्क्यांपर्यंतचा व्याजदराचा लाभ (कूपन रेट्स) मिळविता येईल

## चला पर्यटनाला मेघालयातील जग प्रसिध्द डॉकी तलाव

■ मेघालय हे ईशान्य भारतातील सर्वात सुंदर राज्यांपैकी एक आहे. मेघालयमध्ये अनेक सुंदर पर्यटनस्थळे आहेत. येथे तुम्हाला पर्वत रांगा, उंच पठार, सुंदर धबधबे, नद्या, हिरवी कुरण तसेच नैसर्गिक सौंदर्य पाहायला मिळेल. मेघालयची राजधानी शिलाँग हे पर्यटनासाठी अतिशय लोकप्रिय ठिकाण आहे. मेघालयची राजधानी शिलाँग हे एक सुंदर हिल स्टेशन आहे. या हिल स्टेशनच्या आजूबाजूला हिरवाई दिसते. सुंदर धबधबे आणि उंच टेकड्या आणि सुंदर जंगलांच्या मधोमध असलेल्या या शहरात सर्व सुविधाही उपलब्ध आहेत. मेघालयमध्ये स्थित, डॉकी तलाव त्याच्या सौंदर्यासाठी जगभरात प्रसिद्ध आहे. या तलावाचे पाणी अगदी काचेसारखे चमकते आणि स्वच्छ आहे. पावसाळ्यात डक्की तलावाचे दृश्य अधिकच सुंदर होते. पावसाळ्यात उमंग टोक नदीवर बोट शर्यतीचे आयोजन केले जाते, त्यात सहभागी होऊन मन प्रसन्न होते.चेरापुंजी जगातील सर्वाधिक पाऊस पडण्यासाठी प्रसिद्ध आहे. तसेच हे ठिकाण खूप हिरवेगार आणि सुंदर आहे, जिथे अनेक धबधबे आहेत. निसर्गप्रेमींसाठी हे ठिकाण योग्य आहे. चेरापुंजीला झाडांच्या मुळापासून विकसित नैसर्गिक पूल आहेत, तसेच डवकी, नोहकालिकाई, मवस्माई गुहा ही चेरापुंजीची प्रमुख पर्यटन स्थळे आहेत.मेघालयला गेले तर मौसिनराम सहलीला जाऊ शकतात. पावसाळ्याचा आनंद लुटण्यासाठी इथे येऊ शकता.

■ संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे









दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# महात्मा जोतिराव फुले यांचे सामाजिक क्रांतीकार्य



**भारतीय समाज परिवर्तनाच्या इतिहासात महात्मा जोतिराव फुले हे नाव एका तेजस्वी, धाडसी आणि दूरदृष्टी असलेल्या समाजक्रांतिकारकाचे प्रतीक म्हणून उभे राहते. ११ एप्रिल हा त्यांचा जन्मदिन केवळ स्मरणाचा दिवस नसून, तो समाजातील अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे. महात्मा फुले यांनी भारतीय समाजातील खोलवर रुजलेल्या विषमतेच्या रचनेला आव्हान देत एक नवीन सामाजिक दृष्टिकोन निर्माण केला. त्यांच्या कार्याचा मूलभूत आधार हा मानवमुक्ती, समता, शिक्षण आणि न्याय या मूल्यांवर आधारित होता. त्यांनी आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण समाजातील दुर्बल, वंचित आणि शोषित घटकांच्या उन्नतीसाठी समर्पित केला. महात्मा फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी पुणे येथे झाला. त्या काळात जातिव्यवस्थेचे वर्चस्व इतके प्रबळ होते की, खालच्या जातीतील लोकांना शिक्षण, सामाजिक प्रतिष्ठा आणि संधी यांपासून वंचित ठेवले जात होते. अशा वातावरणात वाढत असताना जोतिरावांना लहानपणापासूनच सामाजिक अन्यायाची जाणीव झाली. शिक्षण घेत असताना त्यांना अनुभवलेल्या अपमानास्पद घटनांनी त्यांच्या मनात प्रश्न निर्माण केले की मानव मानवामध्ये भेद का? काही लोकांना उच्च का मानले जाते आणि काहींना नीच का? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा त्यांचा प्रवास पुढे समाजक्रांतीच्या मार्गावर घेऊन गेला.**

महात्मा फुले यांनी शिक्षणाला समाजपरिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन मानले. त्यांच्या मते, शिक्षणामुळेच अज्ञान, अंधश्रद्धा आणि गुलामीची मानसिकता दूर होऊ शकते. म्हणूनच त्यांनी सर्वप्रथम शिक्षणाच्या क्षेत्रात काम सुरू केले. विशेषतः स्त्रीशिक्षणाच्या बाबतीत त्यांनी घेतलेला पुढाकार ही त्या काळातील सर्वात मोठी सामाजिक क्रांती होती. त्यांनी आपल्या सहचारिणी सावित्रीबाई फुले यांच्या सहकार्याने १८४८ मध्ये पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. या घटनेने भारतीय समाजाच्या इतिहासात एक नवा अध्याय सुरू झाला. त्या काळात स्त्रियांना शिक्षण देणे म्हणजे सामाजिक नियमांचे उल्लंघन मानले जात होते. स्त्रियांना घराच्या चौकटीतच राहण्याची सक्ती होती. शिक्षण मिळाल्यास त्या बंडखोर बनतील, अशी भीती समाजातील उच्चवर्णीयांना वाटत होती. अशा परिस्थितीत महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी अत्यंत धाडसाने हे कार्य हाती घेतले. सावित्रीबाई फुले शाळेत जाताना लोक त्यांच्यावर दगडफेक करत, चिखल फेकत, अपमानास्पद शब्द वापरत; पण त्यांनी या सर्व अडचणींना तोंड देत आपले कार्य अखंडपणे सुरू ठेवले. या संघर्षातून स्त्रीशिक्षणाची चळवळ अधिक बळकट झाली. महात्मा फुले यांनी केवळ मुलींसाठीच नव्हे, तर अस्पृश्य आणि वंचित घटकांसाठीही शाळा सुरू केल्या. त्यांनी समाजातील सर्व स्तरांतील लोकांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. त्यांच्या या कार्यामुळे शिक्षण हे काही विशिष्ट वर्गापुरते मर्यादित राहिले नाही, तर ते सर्वांसाठी खुले झाले. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी समाजात समतेची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

महात्मा फुले यांच्या विचारसरणीचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे जातिव्यवस्थेचा निषेध होय. त्यांनी जातिव्यवस्थेला मानवी प्रगतीसाठी सर्वात मोठा अडथळा मानले. त्यांच्या मते, ही व्यवस्था केवळ सामाजिक अन्यायच नव्हे, तर मानसिक गुलामी निर्माण करते. त्यांनी या व्यवस्थेविरुद्ध संघर्ष करण्यासाठी १८७३ साली 'सत्यशोधक समाज' या संस्थेची स्थापना केली. सत्यशोधक समाजाचा असा उद्देश होता की समाजातील सत्य शोधणे, अज्ञान आणि अंधश्रद्धा दूर करणे, आणि समता व बंधुता प्रस्थापित करणे.

सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून महात्मा फुले यांनी धार्मिक आणि सामाजिक प्रथांमध्ये सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी विवाहसंस्थेतही बदल घडवून आणले. सत्यशोधक पद्धतीने विवाह करण्यासाठी प्रोत्साहित केले. यामुळे समाजातील खालच्या स्तरातील लोकांना सन्मानाने विवाह करण्याची संधी मिळाली.

महात्मा फुले यांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी स्त्रियांच्या प्रश्नांकडे पाहण्याचा दृष्टिकोन. त्यांनी स्त्रीला केवळ घरगुती जबाबदाऱ्यांपुरती मर्यादित न ठेवता, तिला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून मान्यता दिली. त्यांनी विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन दिले, बालविवाहाला विरोध केला आणि स्त्रियांच्या सन्मानासाठी अनेक उपक्रम राबवले. त्यांनी अनाथ मुलांसाठी आणि विधवांसाठी आश्रयस्थाने सुरू केली, ज्यामुळे अनेकांना नवीन जीवन मिळाले. महात्मा फुले यांच्या कार्यात मानवतेचा गाभा होता. त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाला समानतेने वागवण्याचा संदेश दिला. त्यांच्या विचारांमध्ये जात, धर्म, लिंग या आधारांवर भेदभावाला कोणतेही स्थान नव्हते. त्यांनी समाजातील लोकांना जागृत करण्यासाठी लेखनाचाही प्रभावी वापर केला. 'गुलामगिरी' या ग्रंथात त्यांनी जातिव्यवस्थेवर प्रखर टीका केली. त्यांनी या ग्रंथाच्या माध्यमातून समाजातील शोषणाच्या रचनेला उघड केले.

समाजसुधारणेच्या क्षेत्रात महात्मा जोतिराव फुले यांनी केलेले कार्य केवळ शिक्षण, स्त्रीसमानता किंवा जातिव्यवस्था यापुरते मर्यादित नव्हते, तर त्यांनी समाजाच्या आर्थिक पायाभूत रचनेलाही गंभीरपणे स्पर्श केला. त्यांच्या मते, सामाजिक अन्यायाचा पाया हा आर्थिक विषमतेत दडलेला आहे. त्यामुळे समाजातील शोषण समजून घेण्यासाठी आर्थिक संरचनेचे विश्लेषण आवश्यक आहे. त्यांनी शेतकरी, कामगार आणि दुर्बल घटकांच्या जीवनस्थितीचे सखोल निरीक्षण करून त्यांच्या समस्यांना वाचा फोडली.

महात्मा फुले यांच्या काळात भारतात ब्रिटिश सत्तेचा प्रभाव वाढत होता. ब्रिटिशांच्या महसुली धोरणांमुळे शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली होती. जमीन महसूल वसुलीची कठोर पद्धत, कर्जबाजारीपणा, नैसर्गिक आपत्ती आणि बाजारपेठेतील अस्थिरता यामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या कमकुवत होत चालले होते. या परिस्थितीचे वास्तव चित्र उभे करण्यासाठी महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्याचा आसूड' हा महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्यांनी शेतकऱ्यांच्या दुःखद परिस्थितीचे जिवंत चित्रण केले आहे. 'शेतकऱ्याचा आसूड' मध्ये त्यांनी केवळ शेतकऱ्यांच्या अडचणी मांडल्या नाहीत, तर त्या अडचणींच्या मुळावरही प्रहार केला. त्यांनी दाखवून दिले की, शेतकऱ्यांचे शोषण केवळ ब्रिटिश सत्तेमुळेच नव्हे, तर स्थानिक सत्ताधाऱ्यांच्या, सावकारांच्या आणि उच्चवर्णीयांच्या वर्चस्वामुळेही होते. शेतकरी हा उत्पादन करणारा असूनही त्याला त्याच्या श्रमाचे योग्य मूल्य मिळत नव्हते. त्यामुळे तो कायमच कर्जाच्या जाळ्यात अडकून राहत होता. महात्मा फुले यांच्या मते, शेतकरी हा समाजाचा कणा आहे. जर शेतकरी सुखी नसेल, तर समाजाची प्रगती होऊ शकत नाही. त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्यांकडे केवळ सहानुभूतीने न पाहता, त्यावर ठोस उपाय सुचवले. त्यांनी सरकारने शेतकऱ्यांना न्याय्य दर द्यावा, महसुली धोरणे सुलभ करावी आणि सावकारी प्रथेवर नियंत्रण ठेवावे, असे मत मांडले. त्यांच्या विचारांमध्ये शेतकरी कल्याणाचा स्पष्ट दृष्टिकोन दिसून येतो.

महात्मा फुले यांनी कामगार वर्गाच्या समस्यांकडेही लक्ष दिले. औद्योगिकीकरणाच्या सुरुवातीच्या टप्प्यात कामगारांचे शोषण होत होते. कमी वेतन, जास्त कामाचे तास आणि असुरक्षित कामाच्या अटी यामुळे कामगारांचे जीवन अत्यंत कठीण झाले होते. महात्मा फुले यांनी कामगारांच्या हक्कांसाठी आवाज उठवला आणि त्यांच्या सन्मानासाठी लढा दिला. त्यांच्या विचारांमध्ये कामगारांना न्याय्य वागणूक मिळावी, हा मूलभूत दृष्टिकोन होता. महात्मा फुले यांच्या आर्थिक विचारांचा संबंध त्यांच्या सामाजिक विचारांशी घट्ट जोडलेला होता. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, सामाजिक समता आणि आर्थिक समता या एकमेकांशिवाय अपूर्ण आहेत. जर समाजात आर्थिक विषमता असेल, तर सामाजिक न्याय प्रस्थापित होऊ शकत नाही. त्यामुळे त्यांनी आर्थिक न्यायाला सामाजिक परिवर्तनाचा एक महत्त्वाचा घटक मानले.

महात्मा फुले यांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी केलेले लेखन होय. त्यांनी आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी लेखनाचा प्रभावी वापर केला. 'गुलामगिरी' हा त्यांचा अत्यंत प्रसिद्ध ग्रंथ आहे. या ग्रंथात त्यांनी जातिव्यवस्थेवर प्रखर टीका केली आहे. त्यांनी या ग्रंथाच्या माध्यमातून समाजातील शोषणाची रचना उघड केली आणि लोकांना विचार करण्यास प्रवृत्त केले. 'गुलामगिरी' मध्ये त्यांनी अमेरिकेतील गुलामगिरी आणि भारतीय समाजातील जातिव्यवस्था यांची तुलना केली. त्यांनी दाखवून दिले की, भारतीय समाजातील खालच्या जातींची स्थिती ही गुलामांप्रमाणेच आहे. या तुलनेमुळे समाजातील लोकांना आपल्या परिस्थितीची जाणीव झाली आणि त्यांनी परिवर्तनासाठी प्रयत्न सुरू केले. महात्मा फुले यांच्या लेखनात तर्कशुद्धता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवतावाद यांचा संगम दिसतो. त्यांनी अंधश्रद्धा, विषमता आणि सामाजिक अन्याय यांवर प्रखर प्रहार केला. त्यांच्या लेखनामुळे समाजात विचार करण्याची आणि प्रश्न विचारण्याची प्रवृत्ती निर्माण झाली. त्यांनी लोकांना केवळ माहिती दिली नाही, तर त्यांना जागृत केले.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत))**

महात्मा फुले यांच्या कार्याचा प्रभाव केवळ भारतापुरता मर्यादित नाही. त्यांच्या विचारांमध्ये सार्वत्रिक मानवतावाद आहे, जो जगातील कोणत्याही समाजासाठी लागू होऊ शकतो. त्यांनी मांडलेले समतेचे तत्त्वज्ञान हे आजच्या जागतिकीकरणाच्या युगातही तितकेच महत्त्वाचे आहे. सामाजिक न्याय, मानवाधिकार आणि समता या मूल्यांच्या संदर्भात त्यांचे विचार आजही मार्गदर्शक ठरतात.

आजच्या काळात शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी, आर्थिक विषमता आणि सामाजिक अन्याय या समस्या अजूनही अस्तित्वात आहेत. अशा परिस्थितीत महात्मा फुले यांच्या आर्थिक आणि सामाजिक विचारांचा पुनर्विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्या विचारांचा अवलंब करून आपण समाजात अधिक न्याय्य आणि समतावादी व्यवस्था निर्माण करू शकतो. महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचा आढावा घेताना, आपण त्यांच्या विचारांची सखोलता आणि व्यापकता लक्षात घेतली पाहिजे. त्यांनी केवळ समाजातील समस्यांचे निदान केले नाही, तर त्यावर उपायही सुचवले. त्यांच्या कार्यामुळे समाजात परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झाली आणि आजही ती प्रेरणादायी आहे.

भारतीय समाजातील स्त्रीच्या स्थानाचा प्रश्न हा अत्यंत गुंतागुंतीचा आणि संवेदनशील आहे. महात्मा जोतिराव फुले यांनी या प्रश्नाकडे केवळ सहानुभूतीने नव्हे, तर क्रांतिकारी दृष्टिकोनातून पाहिले. त्यांच्या मते, समाजातील खऱ्या प्रगतीसाठी स्त्रीची मुक्ती अत्यावश्यक आहे. स्त्री शिक्षित, स्वावलंबी आणि आत्मसन्मानी झाली, तरच समाजातील समता आणि न्यायाची पायाभरणी मजबूत होऊ शकते. म्हणूनच त्यांनी स्त्रीमुक्तीला आपल्या कार्याच्या केंद्रस्थानी ठेवले.

त्या काळात भारतीय समाजात स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय होती. बालविवाह, विधवांचे अमानुष जीवन, स्त्रीशिक्षणाचा अभाव, आणि पुरुषप्रधान मानसिकता यामुळे स्त्रिया दुय्यम दर्जाच्या नागरिकांप्रमाणे जगत होत्या. विशेषतः विधवांचे जीवन अत्यंत दुःखदायक होते. त्यांना समाजात कोणताही सन्मान नव्हता, त्यांच्यावर अनेक बंधने लादली जात आणि त्यांचे जीवन एक प्रकारची शिक्षा बनत असे. अशा परिस्थितीत महात्मा फुले यांनी विधवा प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष दिले. महात्मा फुले आणि त्यांच्या सहचारिणी सावित्रीबाई फुले यांनी विधवांसाठी आश्रयस्थाने सुरू केली. त्या काळात विधवांना समाजात राहणेही कठीण होते. अनेक वेळा त्यांना घरातून बाहेर काढले जात असे किंवा त्यांना अत्यंत कठीण परिस्थितीत जगावे लागे. अशा महिलांसाठी सुरक्षित आणि सन्मानाचे जीवन मिळावे, यासाठी फुले दांपत्याने मोठे प्रयत्न केले. त्यांनी विधवांना केवळ आश्रय दिला नाही, तर त्यांना आत्मनिर्भर बनवण्याचा प्रयत्न केला.

महात्मा फुले यांनी बालविवाहाला कठोर विरोध केला. त्यांच्या मते, बालविवाहामुळे स्त्रियांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य बिघडते, तसेच त्यांच्या शिक्षणाचा आणि विकासाचा मार्ग बंद होतो. त्यांनी विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन दिले आणि स्त्रियांना नवीन जीवनाची संधी मिळावी, यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या या विचारांमुळे समाजात हळूहळू बदल घडू लागला. महात्मा फुले यांच्या स्त्रीमुक्तीच्या विचारांमध्ये केवळ सामाजिक सुधारणा नव्हती, तर एक व्यापक सांस्कृतिक परिवर्तनाची दिशा होती. त्यांनी स्त्रीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व म्हणून मान्यता दिली. त्यांच्या मते, स्त्री ही पुरुषाची गुलाम नसून समाजाच्या प्रगतीची समान भागीदार आहे. त्यांनी स्त्री-पुरुष समानतेचा विचार मांडून समाजातील पारंपरिक संकल्पनांना आव्हान दिले.

महात्मा फुले यांच्या कार्याचा सांस्कृतिक परिणामही अत्यंत व्यापक होता. त्यांनी समाजातील अंधश्रद्धा, रूढी आणि परंपरांना प्रश्न विचारण्याची प्रेरणा दिली. त्यांच्या विचारांमुळे लोकांमध्ये तर्कशुद्धता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित झाला. त्यांनी धार्मिक विषमता आणि कर्मकांड यांना विरोध करून समाजात नवीन विचारांची बीजे पेरली.

आजच्या आधुनिक समाजातही स्त्रियांच्या समस्यांचा प्रश्न पूर्णपणे सुटलेला नाही. स्त्रीशिक्षणात वाढ झाली असली, तरी लिंगभेद, अत्याचार, आर्थिक असमानता आणि सामाजिक भेदभाव अजूनही अस्तित्वात आहेत. अशा परिस्थितीत महात्मा फुले यांच्या स्त्रीमुक्तीच्या विचारांची पुनरावृत्ती करणे आवश्यक आहे. त्यांच्या विचारांचा अवलंब करून आपण स्त्रीसमानतेच्या दिशेने अधिक प्रभावी पावले उचलू शकतो.

महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या स्त्रीमुक्तीच्या कार्याचा विचार करताना, त्यांच्या धैर्याची आणि दूरदृष्टीची जाणीव होते. त्यांनी समाजातील सर्वात कठीण आणि संवेदनशील प्रश्नांवर काम केले आणि त्यासाठी संघर्ष केला. त्यांच्या कार्यामुळे समाजात परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झाली आणि आजही ती प्रेरणादायी आहे. त्यांनी दिलेला संदेश स्पष्ट आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान संधी आणि सन्मान मिळाला पाहिजे. स्त्री-पुरुष समानता ही केवळ एक आदर्श संकल्पना नसून, ती समाजाच्या प्रगतीसाठी अत्यावश्यक आहे. त्यांच्या कार्याचा खरा सन्मान म्हणजे त्यांच्या विचारांचे अनुसरण करणे आणि समाजात समता व न्याय प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करणे.

आजच्या काळात महात्मा फुले यांच्या विचारांची उपयुक्तता अधिक अधोरेखित होते. आधुनिक समाजात तंत्रज्ञान, शिक्षण आणि आर्थिक विकास यांमध्ये प्रगती झाली असली, तरी सामाजिक विषमता अजूनही अस्तित्वात आहे. जातीयता, लिंगभेद, आर्थिक असमानता आणि सामाजिक अन्याय या समस्या अजूनही आपल्या समाजात दिसून येतात. अशा परिस्थितीत महात्मा फुले यांच्या विचारांचा पुनर्विचार करणे अत्यंत आवश्यक आहे.

शिक्षणाच्या क्षेत्रात आजही अनेक आव्हाने आहेत. शिक्षणाची गुणवत्ता, सर्वांसाठी समान संधी, आणि शिक्षणातील असमानता हे प्रश्न आजही उपस्थित आहेत. महात्मा फुले यांनी शिक्षणाला दिलेले महत्त्व लक्षात घेता, आजच्या काळातही शिक्षणाचा प्रसार आणि गुणवत्तेचा विकास करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्या विचारांचा अवलंब करून आपण शिक्षण क्षेत्रात अधिक समतोल आणि न्याय्य व्यवस्था निर्माण करू शकतो. स्त्रीसमानतेच्या संदर्भातही महात्मा फुले यांचे विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत. स्त्रियांना शिक्षण, रोजगार आणि सामाजिक सन्मान मिळत असला, तरी अजूनही अनेक ठिकाणी त्यांना भेदभावाचा सामना करावा लागतो. महात्मा फुले यांच्या स्त्रीमुक्तीच्या विचारांचा अवलंब करून आपण या समस्यांवर अधिक प्रभावी उपाय शोधू शकतो. महात्मा फुले यांच्या विचारांचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी दिलेला तर्कशुद्ध आणि वैज्ञानिक दृष्टिकोन. आजच्या माहितीच्या युगातही अंधश्रद्धा आणि चुकीच्या समजुती समाजात अस्तित्वात आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्या विचारांचा अवलंब करून आपण समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करू शकतो.

महात्मा फुले यांच्या कार्याचा आढावा घेताना, आपण त्यांच्या दूरदृष्टीची जाणीव करतो. त्यांनी ज्या समस्या त्यांच्या काळात ओळखल्या, त्या आजही अनेक प्रमाणात अस्तित्वात आहेत. त्यामुळे त्यांच्या विचारांचा अभ्यास आणि त्यांची अंमलबजावणी आजच्या काळात अधिक आवश्यक आहे. भारतीय समाजाच्या दीर्घकालीन परिवर्तन प्रक्रियेत महात्मा जोतिराव फुले यांचे कार्य हे केवळ ऐतिहासिक घटनेपुरते मर्यादित न राहता, एक जिवंत विचारधारा म्हणून आजही आपल्या समोर उभे आहे. त्यांच्या विचारांचे आणि कार्याचे समकालीन संदर्भात पुनर्मूल्यांकन करणे ही आजच्या काळाची अत्यंत गरज आहे. कारण समाज बदलला असला, आधुनिकतेची झळाळी वाढली असली, तरी विषमता, अन्याय आणि शोषणाच्या समस्या विविध स्वरूपांत अजूनही अस्तित्वात आहेत.

महात्मा फुले यांनी मांडलेली समतेची संकल्पना ही केवळ सामाजिक स्तरापुरती मर्यादित नव्हती, तर ती सर्वांगीण होती. त्यांनी शिक्षण, अर्थकारण, लिंगसमानता, धर्म आणि संस्कृती या सर्व क्षेत्रांमध्ये समतेचा आग्रह धरला. आजच्या काळात 'समावेशक विकास' ही संकल्पना मोठ्या प्रमाणात चर्चेत आहे. परंतु, या संकल्पनेचा मूलाधार महात्मा फुले यांच्या विचारांमध्येच दिसून येतो. त्यांनी ज्या प्रकारे समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी मिळावी, असा आग्रह धरला, तो आजच्या धोरणनिर्मितीसाठीही मार्गदर्शक ठरू शकतो.

आजच्या समाजात शिक्षणाची व्याप्ती वाढली असली, तरी शिक्षणातील विषमता अजूनही कायम आहे. ग्रामीण-शहरी दरी, आर्थिक असमानता, डिजिटल विभाजन आणि गुणवत्तेतील तफावत या समस्या अजूनही जाणवतात. महात्मा फुले यांनी शिक्षणाला दिलेले महत्त्व लक्षात घेतले, तर आपल्याला जाणवते की, शिक्षण हे केवळ साक्षरतेपुरते मर्यादित नसून, ते विचारक्षमतेचा विकास करणारे साधन आहे. त्यामुळे आजच्या शिक्षणव्यवस्थेतही त्यांच्या विचारांचा समावेश करणे आवश्यक आहे.

महात्मा फुले यांच्या कार्याचा प्रभाव पुढील अनेक पिढ्यांवर पडला आहे. विशेषतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या विचारांना पुढे नेले आणि भारतीय समाजात सामाजिक न्यायाची संकल्पना अधिक बळकट केली. डॉ. आंबेडकर यांनी महात्मा फुले यांना आपले प्रेरणास्थान मानले आणि त्यांच्या कार्याला पुढे नेण्याचे काम केले. त्यामुळे महात्मा फुले यांची परंपरा आजही जिवंत आहे.

समकालीन काळात महात्मा फुले यांच्या विचारांचे पुनर्मूल्यांकन करताना, आपण त्यांच्या कार्यातील समता, बंधुता, न्याय आणि मानवता या मूलभूत मूल्यांकडे लक्ष दिले पाहिजे. ही मूल्ये आजच्या समाजासाठीही तितकीच आवश्यक आहेत. जागतिकीकरणाच्या युगात, जिथे विविध संस्कृती, धर्म आणि विचारसरणी एकत्र येत आहेत, तिथे समतेचा आणि सहिष्णुतेचा विचार अधिक महत्त्वाचा ठरतो.

समारोप करताना असे म्हणता येईल की, महात्मा जोतिराव फुले हे केवळ एका काळातील समाजसुधारक नव्हते, तर ते एक शाश्वत विचारप्रवाह आहेत. त्यांच्या कार्यामुळे समाजात समतेची आणि न्यायाची बीजे पेरली गेली. आज त्या बीजांचे वृक्ष झाले आहेत, पण त्यांची निगा राखण्याची जबाबदारी आपली आहे. त्यांच्या विचारांचा अंगीकार करून आपण एक अधिक समतावादी, न्याय्य आणि मानवतावादी समाज निर्माण करू शकतो. अशा या महान समाजक्रांतिकारकाला त्यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करताना, आपण त्यांच्या आदर्शांचा स्वीकार करून समाजात परिवर्तन घडवून आणण्याचा संकल्प करूया.



# बीड स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई

## चोरीची अल्युमिनियम तार वाहतूक करणारा आयशर टेम्पो पकडला, ९.५० लाखांचा मुद्देमाल जप्त

**बीड | प्रतिनिधी**

जिल्ह्यात चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने (LCB) कंबर कसली असून, चोरीची अल्युमिनियम तार घेऊन जाणारा एक आयशर टेम्पो पकडून साडे नऊ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. बीड ते नेकनूर मार्गावर नांदूर फाटा येथे ही कारवाई करण्यात आली.

■ **नेमकी घटना काय? -**

दिनांक ९ एप्रिल २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, एका विटकरी रंगाच्या आयशर टेम्पोमधून विद्युत वितरण कंपनीची चोरी केलेली तार विक्रीसाठी बीड ते नेकनूर मार्गे केजकडे जात आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी नांदूर फाट्याजवळ सापळा लावून टेम्पो अडवला.

टेम्पोची झडती घेतली असता, त्यामध्ये अल्युमिनियम तारेची १२ बंडल आढळली. याचे वजन अंदाजे १५०० किलो असून त्याची किंमत ४,५०,००० रुपये आहे. पोलिसांनी या तारेसह वाहतुकीसाठी वापरलेला आयशर टेम्पो देखील जप्त केला आहे. असा एकूण ९,५०,००० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

याप्रकरणी टेम्पो चालक सुखदेव सुभाष गायके (वय ३१ वर्ष, रा. धारूर, जि. बीड) याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी पोलीस ठाणे नेकनूर येथे गु.र.नं १४०/२०२६ कलम १२४ म.पो.अधि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास नेकनूर पोलीस करत आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड, आशपाक सय्यद, मनोज परजणे, सिद्धेश्वर मांजरे व विकास राठोड यांच्या पथकाने यशस्वीरित्या पूर्ण केली.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, शनिवार 11 एप्रिल 2026
Last page

# मतदार पुनरीक्षण आणि मॅपिंगसाठी शहरातील सर्व मतदान केंद्रावर 2 दिवसीय विशेष शिबीर



## मॅपिंग करून घ्या, अन्यथा मतदार यादीतून नाव कायमचे वगळले जाणार | ना. पंकजाताई मुंडे यांच्या सूचनेनुसार मतदारांनी शिबीराचा लाभ घ्यावा- प्रा. पवन मुंडे

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

शहरातील सर्व मतदारांचे मतदार पुनरीक्षण आणि मॅपिंग करण्यासाठी सर्व मतदान केंद्रावर रविवार आणि सोमवार अशा 2 दिवसीय विशेष शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. मॅपिंग नाही केले तर मतदार यादीतून नाव कायमचे वगळले जाणार आहे. नाव वगळले तर सर्व शासकीय सवलतीपासुन वंचित रहावे लागणार आहे. त्यामुळे मतदारांनी राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या सूचनेनुसार शासकीय सवलती आणि मतदानाच्या हक्कासाठी दोन दिवसीय शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे यांनी केले आहे.

बनावट व दुबार मतदारांची नावे वगळण्यासाठी निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार मतदार याद्यांची संक्षिप्त सखोल चौकशी (एसआयआर) परळी वैजनाथ तालुक्यात गतीने सुरू आहे. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार एप्रिल महिन्यात विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत २००२ नंतर स्थलांतरित झालेले मतदार, इतर तालुके किंवा जिल्ह्यांतून आलेले नागरिक यांचा समावेश करण्यात येत आहे. संबंधित मतदारांनी २००२ मधील मतदार यादीतील माहिती बीएलओकडे सादर करावयाची आहे. ही प्रक्रिया शहरात अचूकपणे आणि वेगाने राबविण्यात यावे यासाठी पवन मुंडे यांनी उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर यांची भेट घेऊन चर्चा केली. स्वतः पवन मुंडे हे शहराच्या विविध भागांमध्ये बैठका घेऊन ही प्रक्रिया वेगात करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. कार्यकर्त्यांच्याही भेटीगाठी घेऊन त्यांनी या प्रक्रियेला वेग देण्याचे आवाहन केले आहे.

रविवार आणि सोमवार 2 दिवस विशेष शिबीर

मतदार पुनरीक्षण आणि मॅपिंगसाठी मतदारांची सोय व्हावी म्हणून शनिवार रविवार दि. 12 व सोमवार दि. 13 मार्च असे दोन दिवस शहरातील सर्व मतदान केंद्रावर मतदार पुनरीक्षण आणि मॅपिंग विशेष शिबीर आयोजित करण्यात आले आहे. विधानसभा, लोकसभेला मतदान करण्यासाठी जसे जाता अगदी तसेच जाऊन मॅपिंग करून घ्यावी असे आवाहन प्रा. पवन मुंडे यांनी केले आहे. सलग दोन दिवस प्रत्येक मतदान केंद्रावर बीएलओ पुर्ण दिवसभर थांबून मतदार पुनरीक्षण आणि मॅपिंग करणार आहेत.

मतदारांनी अगदी मतदानाला ज्याप्रमाणे जातो त्याप्रमाणे जाऊन मॅपिंग करून घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे. ज्यांनी मॅपिंग केली नाही अशांचे नाव मतदार यादीमधून कायमचे वगळले जाऊ शकते आणि पुन्हा मतदार यादी मध्ये नाव समाविष्ट करण्यासाठी अतिशय किचकट आणि प्रदीर्घ प्रक्रिया आहे. तसेच मतदार यादीतून नाव वगळल्यानंतर शासनाच्या कोणत्याही योजनेचा फायदा घेता येणार नाही. त्यामुळे नागरिकांनी या दोन दिवसीय शिबिराचा लाभ घेऊन आपले मॅपिंग करून घ्यावे असे आवाहन बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे यांनी केले आहे.

मतदार पुनरीक्षण आणि मॅपिंग करण्यासाठी जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत जाऊन कार्यकर्त्यांनी त्यांना मतदान केंद्रापर्यंत घेऊन यावे असे आवाहन प्रा. पवन मुंडे यांनी केले आहे.

# आष्टी शहरात आज क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंतीचा भव्य उत्सव, जयत तयारी

**आष्टी | प्रतिनिधी:**



समाजप्रबोधन, शिक्षण आणि शेतकरीहिताचे महान पुरस्कर्ते क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त आज ११ एप्रिल रोजी शहरासह तालुक्यात विविध ठिकाणी भव्य-दिव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.आष्टी शहरात मागिल अनेक वर्षापासून मोठ्या उत्साहात विविध कार्यक्रमांचे सामाजिक उपक्रमांचे भान राखून उपक्रम राबविले जात आहेत. महात्मा फुले यांची १९९ वी जयंती दि.११ एप्रिल रोजी विविध कार्यक्रमांनी साजरी होणार आहे.यामध्ये महा रक्तदान शिबीर पाडले पार,प्रतिमा पुजन,भव्य शोभायात्रा, पंजाबी पथक या विविध कार्यक्रमांचा शहर पंचक्रोशीतील सर्व फुले प्रेमी महिला ,पुरुष, युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन सार्वजनिक महात्मा फुले जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.जयंतीची तयारी अंतिम टप्प्यात आली असून कमानी थाटल्या आहेत. फुलेंची प्रतिमा असलेले झेंडे चौकात लावण्यात आले आहे.

स्त्री शिक्षणाची मुहुर्तमेढ रोवणाऱ्या महात्मा जोतिबा फुले यांची जयंती आष्टी शहरात धुमधडाक्यात सालाबादप्रमाणे ११ एप्रिल रोजी शहरातून भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबवून जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येते यावर्षी देखील जयंती उत्सवानिमित्त दि.९ एप्रिल रोजी भव्य रक्तदान शिबीर पार पडले रक्तदात्यांना आकर्षक भेट वस्तू देण्यात आले.तर दि.१० रोजी सायंकाळी सायं ५ भव्य वकृत्व स्पर्धचे आयोजन करण्यात आले आहे.दि.११ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता आष्टी शहरातील महात्मा फुले चौक येथे प्रतिमा पूजन होईल व सायंकाळी ४ ते १० पर्यंत भव्य शोभायात्रा होणारा असून प्रमुख आकर्षक बॅन्जो व कोल्हापूर येथील हलगी पथक ,पंजाबचे पथक असणार आहे. वरील सर्व कार्यक्रमांचा पंचक्रोशीतील नागरिकांनी लाभ घ्यावा व सर्व फुले प्रेमींनी,महिला, पुरुष,लहान मुले मुली,युवकांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी होऊन कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन सार्वजनिक महात्मा फुले जयंती उत्सव आष्टी च्या वतीने करण्यात आले आहे.

# धक्कादायक! 'लबाड लांडग्यांनी शिकार केली!'

## पत्नीच्या त्रासाचा फेसबुकवर `पाढा` वाचला

### अनेक नावांचा उल्लेख अन् फेसबुक पोस्ट; तरुणाच्या आत्महत्येने बीडमध्ये खळबळ

### पत्नीच्या त्रासाला कंटाळून फेसबुक पोस्ट करत तरुणाची आत्महत्या बीड जिल्हा हादरला


**परळी | प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातून एक मन सुन्न करणारी घटना समोर आली आहे. पत्नी आणि नातेवाईकांकडून होणाऱ्या छळाला कंटाळून परळी तालुक्यातील नागापूर येथील एका तरुणानं टोकाचं पाऊल उचललं आहे. आत्महत्या करण्यापूर्वी संबंधित तरुणानं फेसबुकवर आपली कैफियत मांडणारी पोस्ट शेअर केली असून, या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

■ **फेसबुकवर मांडली व्यथा-**

रामेश्वर गव्हाणे (रा. नागापूर, ता. परळी) असं या तरुणाचं नाव. रामेश्वर यांनी शुक्रवारी आपल्या शेतात विषारी औषध प्राशन करून गळफास घेत आपली जीवनयात्रा संपवली. मात्र, हे पाऊल उचलण्यापूर्वी त्यांनी फेसबुकवर एक सविस्तर पोस्ट लिहिली होती. यामध्ये त्यांनी आपली पत्नी, तिचे नातेवाईक, काही इतर नावांचा उल्लेख करत त्यांच्याकडून होणाऱ्या त्रासाचा पाढा वाचला आहे. "लबाड लांडग्यांनी शिकार केली," अशा शब्दांत त्यांनी आपलं दुःख व्यक्त केलं होतं.

■ **संपर्क करण्याचा प्रयत्न फसला-**



रामेश्वर यांची ही संशयास्पद फेसबुक पोस्ट पाहिल्यानंतर त्यांचे मित्र आणि नातेवाईकांनी तातडीनं त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. अनेकांनी त्यांना फोन केले, मात्र प्रतिसाद मिळाला नाही. काही वेळातच त्यांच्या निधनाची बातमी समोर आल्यानं परिसरात शोककळा पसरली आहे.

■ **तपासाचे आव्हान-**



एका तरुणाला अशा प्रकारे फेसबुक पोस्ट करून आपलं आयुष्य संपवावं लागल्यानं प्रशासकीय आणि कायदेशीर वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे. या पोस्टमध्ये उल्लेख केलेल्या व्यक्तींवर पोलीस काय कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, या घटनेनं परळी तालुक्यासह बीड जिल्ह्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# गातेगाव येथील समाधान शिबिरात अनेकांना विविध योजनेचा प्रत्यक्ष लाभ

## सबका साथ, सबका विकास, सबका प्रयास यानुसार भाजपा सरकारने जनहिताच्या योजना सुरू केल्या

## एकही पात्र वंचित राहू नये अधिकाऱ्यांनी काळजी घ्यावी - आ. कराड

**लातूर | प्रतिनिधी**

भाजपाच्या नेतृत्वातील केंद्र आणि राज्य शासनाने तोंड बघून नव्हे तर गरजूंना लाभ मिळावा, पात्र लाभार्थ्यांना मदत व्हावी यासाठी सबका साथ सबका विकास सबका प्रयास याप्रमाणे सर्वसामान्यांना केंद्रबिंदू मानून अनेक महत्त्वपूर्ण योजना सुरू केल्या या सर्व योजनेपासून एकही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत असे प्रतिपादन लातूर ग्रामीणचे आ. रमेशअप्पा कराड यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियाना अंतर्गत लातूर तालुक्यातील मौजे गातेगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या समाधान शिबिराचे उद्घाटन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांच्या शुभहस्ते शुक्रवारी झाले याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, विभागीय सहआयुक्त डॉ. अनंत गव्हाणे, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे, तहसीलदार सौदागर तांदळे, गटविकास अधिकारी शाम गोडभरले, अप्पर तहसीलदार सागर मुळीक, जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष नाथसिंह देशमुख, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, मंडल अध्यक्ष सुरज शिंदे, प्रताप पाटील, बन्सी भिसे, माजी जिप सदस्य राजकुमार कलमे, पांडुरंग गडदे गातेगावचे उपसरपंच ज्ञानेश्वर जुगल यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी विविध गावचे सरपंच, विविध विभागाचे अधिकारी



कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शासनाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या विविध जनकल्याणकारी योजनांचा प्रत्यक्ष लाभ देण्यासाठी, लाभार्थ्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी शासनाच्या वतीने समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. याचा निश्चितपणे अनेकांना लाभ मिळेल फायदा होईल असे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, लातूर तालुक्यातील नव्वद टक्के कुटुंब कोणत्या ना कोणत्या योजनेचे लाभार्थी आहेत. ज्यांच्यासाठी योजना सुरू केल्या आहेत त्यांना लाभ देण्याचे काम भाजपाच्या नेतृत्वातील सरकारच्या माध्यमातून होत असल्याचे त्यांनी बोलून दाखवले.

मुख्यमंत्री बळीराजा पाणंद शेत रस्ता योजना राज्यशासनाने हाती घेतली असून पहिल्या टप्प्यातील रस्त्याची कामे पंधरा दिवसात सुरू होऊन पावसाळ्यापूर्वी पूर्ण होतील. येत्या दोन वर्षात लातूर ग्रामीण मतदार संघातील एकही शिवरस्ता शिल्लक राहणार नाही. स्वतःचे कबाले नसल्यामुळे अनेकांना घरकुल योजनेचा लाभ मिळत नव्हता या पुढील काळात एकही पात्र लाभार्थी कबाल्यापासून वंचित राहणार नाही अशी माहिती आ. रमेशअप्पा कराड यांनी यावेळी बोलताना दिली.

विविध योजनेचा लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी डिजिटल युगात शासन दारापर्यंत आले आहे. प्रत्येक योजनेचा लाभ त्या त्या लाभार्थ्यापर्यंत पोहोचण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी बोलून दाखवले तर समाधान शिबिरातून देण्यात येणाऱ्या सोयी सुविधा आणि योजनांची माहिती उपजिल्हाधिकारी रोहिणी नऱ्हे यांनी दिली प्रारंभी तहसीलदार सौदागर तांदळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. शेवटी गोविंद शिंगडे यांनी आभार मानले.

या समाधान शिबिरात कबाले मालकीपत्र, ऊस तोडणी यंत्र, ट्रॅक्टर वाटप, संगायो पात्र लाभार्थ्यांना मंजुरीपत्र, डिजिटल शिधापत्रिका, घरकुलासाठी पाच ब्रास वाळूचे कुपन, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान, लेक लाडकी योजनेचा हप्ता वाटप, दुधाळ गट, बेबी केअर किट, रहिवासी आणि उत्पन्न प्रमाणपत्र, जिवंत सातबारा, डिजिटल सातबारा, प्रलंबित फेरफार, आयुष्यमान भारत कार्ड, गातेगाव मंडळ गावातील गाव नकाशे, लखपती दीदी योजनेचे पत्र यासह विविध योजनेतील पात्र लाभार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मंजुरी पत्राचे व प्रत्यक्ष लाभाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास गातेगाव महसूल मंडळातील जवळपास सर्वच चौदाही गावातील नागरिक महिला पुरुष मोठ्या संख्येने होते.